MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात



शुभेच्छा बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी पदी अविनाशजी पाठक साहेब यांनी पदभार स्वीकारल्या बद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी आज त्यांची सदिच्छा भेट घेऊन बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने त्यांना हार्दीक हार्दीक शुभेच्छा दिल्या. यावेळी उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर, उपजिल्हाप्रमुख हनुमान जिजा जगताप, उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले, उपजिल्हाप्रमुख आशिष मस्के,शहर प्रमुख शेख निजाम भाई,शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे, आष्टी उपतालुकाप्रमुख अशोक पवार, सय्यद नयुम भाई,जयंत वाघ,अजय गायकवाड, दिपक घोडके, विनोद गुंड पाटील,मनोज भराटे सह शिवसेनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते...!! शिवसेनाबीड उद्धवबाळासाहेबठाकरे आदित्यउद्धवठाकरे सुनीलप्रभू किशोरपोतदार

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२७८ | सोमवार दि.०१ जुलै २०२४ | आरएनआय –एमएएचएमआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -278 | MONDAY DT. 01 JULY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# सावधान!

# ताईसाहेबाचे अभिनंदन, गुलालाचा,अधिकार फक्त निष्ठावंताचा

राजेंद्र मस्के सलीम जहांगीर देविदास नागरे मुन्ना पडणे गुलाल अंगावर घेण्याचा नैतिक अधिकार नाहीत?
राजेंद्र मस्के सलीम जहांगीर देविदास नागरगोजे मुन्ना फड यांना ताईच्या विधान परिषदेचा गुलाल घेण्याचा अधिकार नाही?
मुन्ना फड तुम्ही एकाही गावात गेला का नाही नाळवंडी सर्कल मधील गावात पंकजाताई ऐवजी प्रीतम ताई चौकशी करावी.?
राजेंद्र मस्के, सलीम जहांगीर, देविदास नागरगोजे, मुन्ना फड, यांनी आपापल्या गावातील व सर्कल मधील ताईला दिलेली लीड सांगून आनंद उत्सव साजरा करावा व गुलाल स्वतःच्या अंगावर घ्यावा?
ताईच्या विधान परिषदेचा आनंदाचा गुलाल घेण्याचा अधिकार निष्ठावंत मुंडे भक्तांनाच ?
ताईचा बीड लोकसभेचा पराभव डोळ्यासमोर ठेवून राजेंद्र मस्केने जबाबदारी स्वीकारत राजीनामा का दिला नाही.?

## दलाल वृत्तीच्या बडव्या लोकांनी पंकजाताई मुंडे यांची यंत्रणा लोकसभा निवडणुकीत पाडण्यासाठी वापरणाऱ्या बीड जिल्हा भाजप प्रचार कार्यालयातील ते सहा ते सात दलाल यांनी गुलाल घेण्याचा नैतिक अधिकार नाही.

## ताईचा पराभव बीड लोकसभेमध्ये याच लोकांमुळे झाला होता. आता तरी या लोकांना ताईनेजवळ करू नये सावंत कार्यकर्त्यांकडून ताईकडे मागणी.

## गुत्तेदारीसाठी मरमर करणाऱ्या राजेंद्र मस्के सलीम गुन्हा देविदास, मुन्ना फळ यांनी आनंद उत्सव साजरा करताना पंकजाताई आपल्याला जवळ करील किंवा नाही अशा आशयाची धगधगी यांच्या मनात सध्या चालू आहे.?

## राजेंद्र मस्केच्या राजकीय गोष्टी व्हायरल होण्याची शक्यता. भाजपमधील अनेक जणांकडून राजेंद्र मस्के च्या विरोधात षडयंत्र?



बीड प्रतिनिधी – बीड लोकसभा जातीचे राजकारण महाराष्ट्रामध्ये पेटलं याच महाराष्ट्राच्या जातीच्या राजकारणामध्ये भाजपाला अनेक जागी पराभूत व्हावं लागलं याचं जिवंत उदाहरण असतानाच बीड लोकसभा निवडणुकीमध्ये २०२४ ला पंकजाताई मुंडे यांचा पराभव काही मतांनी झाला परंतु पक्षाने पुन्हा एकदा पंकजाताई मुंडे यांना विधान परिषदेवर घेत काम करण्याची संधी दिली तर ही संधी नव्हे तर मुंडे प्रेमींसाठी एक आनंदाची बातमी आहे. तर यावेळी मात्र आज सुद्धा पंकजाताई मुंडे यांच्या निवडीचे महाराष्ट्रामध्ये स्वागत होत असतानाच विधान परिषदेच्या निवडणुकीच्या अगोदरच पंकजाताई मुंडे या विजयी झालेले आहेत. तर यावेळी बीड जिल्हा भाजपच्या वतीने काम करत असताना दलाल वृत्तीच्या बडव्या कार्यकर्त्यांना काम करण्याची संधी पंकजाताई मुंडे यांनी बीड लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये काम करण्याची संधी भाजपाचे प्रचार कार्यालय असलेले जालना रोडवरील एका कार्यालयामध्ये सर्व कामाची जबाबदारी व विश्वासाने काम करा असा आदेश पंकजाताईंनी देत काही कार्यकर्त्यांवर आदेश दिले व विश्वास टाकला.यावेळी मात्र भाजपाची मिरवणारे नेते मंडळी म्हणजेच अर्थात बीड लोकसभेची जिम्मेदारी असलेले भाजप संघटन सरचिटणीस नागरगोजे अध्यक्ष चंद्रकांत फड भाजपाचे अल्पसंख्यांचे उपाध्यक्ष सलीम जहांगीर भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के काही अन्य कार्यकर्त्यांना ताईसाहेबांनी विश्वास टाकून काम करण्यास सांगितले परंतु याच कार्यकर्त्यांनी बीड लोकसभेमध्ये ताईची लीड ही ६१ हजाराने कमी केली नाही. तर ती लीड एक लाख मतांनी कमी केली अशी चर्चा बीड जिल्ह्यामध्ये आहे. याच वरील मंडळींनी व सहा ते सात बडव्या दलाल वृत्तीच्या कार्यकर्त्यांनी ग्रामीण भागातून येणाऱ्या वेगवेगळ्या जाती धर्मातील पक्ष संघटनेच्या कार्यकर्त्यांना भाषा वापरत संघटनेच्या पक्षाच्या सभा छोटे छोटे समाजाच्या सभा ताईंना या कार्यक्रमासाठी नको आहेत. असं सांगून त्यांनी ताईचा पराभव आपल्या हाताने ओढून आणून २०२४ मध्ये बीड लोकसभेमध्ये ताईचा पराभव याच वरील मंडळींनी केलेला आहे म्हणून याच होईल मंडळींनी सलीम देविदास मुन्ना व भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांना यावेळी ताईच्या बीड विधानसभेच्या आनंदोत्सवाचा गुलाल घेण्याचा नैतिक अधिकार नसल्याने आज त्यांनी गुलाल अंगावर घेऊन स्वतःचा अपमान करून घेऊ नये. बीड जिल्ह्यातील जनतेचा व पंकजाताई मुंडे यांच्या निष्ठावंत मुंडे भक्तांचा अंगावरती हा गुलाल पडायला पाहिजे पंकजाताई मुंडे येणाऱ्या काळामध्ये मंत्री होतील. आणि आपली आर्थिक पोळी कशी भाजून घ्यायची आता याची चर्चा याच नेतेमंडळी कडून होत आहे. परंतु याच नेते मंडळींनी दलालपणा बंद करून भाजपाच्या जिल्हाध्यक्ष, जिल्हा कोषाध्यक्ष, जिल्हा संघटन सरचिटणीस, पदाचे राजीनामा यावेळी द्यायला पाहिजे. कारण या लोकांमुळे पंकजाताईंचा पराभव झालेला आहे पंकजाताई मुंडे यांच्या निष्ठावंतांमध्ये मात्र आनंदाचे वातावरणात महाराष्ट्रामध्ये पाहायला मिळत आहे पंकजाताई मुंडे यांची आनंद उत्सव साजरा करत असताना आज सर्व कार्यकर्त्यांच्या भावना अनावर झाले आहेत. स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचा बालेकिल्ला बीड जिल्हा बीड जिल्हा म्हणून घोषणा देत आहेत. परंतु पंकजाताई मुंडे यांनी बीड भाजपमधील ज्यांच्यामुळे आपला पराभव झाला आहे. अशा कार्यकर्त्यांना बाजूला न्याय द्यावा अशीही चर्चा बीड जिल्ह्यातील जनतेस कडून ऐकायला मिळत आहेपंकजाताई मुंडे यांच्या आनंदाने बीड जिल्ह्यातून पंकजाताई मुंडे यांच्या वरती अभिनंदन वर्षा होत आहे तर यावेळी पंकजाताई मुंडे या येणाऱ्या काळामध्ये मंत्री नक्कीच होऊन बीड जिल्ह्याच्या विकासाला कलाटणी मिळणार आहे.

# ‘लाडकी बहिण’ योजना अल्पसंख्याक, गरीब महिलांच्या जीवनात मोठा हातभार लावणार – इर्शाद भाई

**बीड /प्रतिनिधी**
**मध्यप्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रातही ’लाडकी बहिण’ योजना सुरु व्हावी अशी आग्रहाची मागणी भारतीय जनता पार्टी च्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी केली होती. त्यांच्या या कल्याणकारी मागणीला यश आले असून ही योजना अल्पसंख्याक, गरीब महिलांच्या जीवनात मोठा हातभार लावणार आहे. या योजनेचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन भाजपा अल्पसंख्याक मोर्चा चे युवा नेते शेख इरशाद (बिल्डर) यांनी केले आहे.**

मध्यप्रदेशात प्रचंड लोकप्रिय ठरलेल्या ’लाडली बहना’ योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्रात ’लाडकी बहीण’ योजना राबवण्याची मागणी भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी केली होती.



पंकजाताई मुंडे ह्या मध्यप्रदेशात भाजपच्या सह प्रभारी असल्याने त्यांच्या मागणीची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना घोषित केली असून नुकताच राज्याचा अर्थसंकल्प विधीमंडळात सादर केला. यात योजनेच्या प्रभावी अमलबजावणीसाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेनुसार २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना प्रत्येकी दरमहा दीड हजार रूपये आर्थिक सहाय्य मिळणार आहे. ही योजना लागू झाल्यामुळे राज्यातील तमाम महिला वर्गात आनंद व्यक्त होत आहे. शेख इरशाद यांनी पंकजाताईंच्या मागणीला यश आल्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत. या योजनेचा लाभ जास्तीत जास्त अल्पसंख्याक, गरीब महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन भाजपा अल्पसंख्याक मोर्चा चे युवा नेते शेख इरशाद भाई (बिल्डर) यांनी केले आहे.



बीड जिल्ह्याचे भुमिपुत्र, शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष लोकनेते स्व.विनायकरावजी मेटे साहेब यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी स्मृतीस्थळावर जावुन अभिवादन करुन दर्शन घेतले.



मा. नितिन बबन भोंडवे
(युवा पत्रकार,बीड – पाटोदा )
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक : दै.आरंभ परिवार

# नामदेवराव दादा क्षीरसागर यांच्या निधनाने जिल्ह्यातील एक प्रखर सामाजिक चळवळ

# आज शांत झाली – धनंजय मुंडे

**मुंबई ।प्रतिनिधी**
**दै. चंपावती पत्र चे संपादक तथा बीड जिल्ह्याच्या पत्रकारितेतील भीष्म पितामह नामदेवराव दादा क्षीरसागर यांचे आज सकाळी दु:खद निधन झाले असून नामदेवराव दादा यांच्या दु:खद निधनाने बीड जिल्ह्यातील एक प्रखर सामाजिक चळवळ आज शांत झाली, अशा शब्दात बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी शोक व्यक्त केला आहे. बीड जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी कृती समितीचे निमंत्रक म्हणून नामदेवराव दादा क्षीरसागर यांनी बीड जिल्ह्याच्या महत्त्वकांक्षी अहमदनगर बीड परळी या रेल्वे मार्गाच्या कामासाठी अनेक वर्षांपासून मोठी चळवळ उभी केली होती.**



बीड जिल्ह्याच्या पत्रकारितेतील भीष्मपितामह तसेच चंपावती रत्न अशी देखील नामदेवराव दादा क्षीरसागर यांची महती होती.

आज वयाच्या ८३ व्या वर्षी त्यांचे दुःखद निधन झाले असून आपल्यासाठी ज्येष्ठ मार्गदर्शक व आदर्श असे व्यक्तिमत्व असलेले नामदेवराव दादा क्षीरसागर यांच्या निधनाबद्दल मी दुःख व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण करतो, तसेच क्षीरसागर परिवार व दैनिक चंपावती पत्र परिवाराच्या दुःखात मी सहभागी आहे, असेही धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. धनंजय मुंडे व नामदेवराव क्षीरसागर यांच्यात अखेरची भेट झाली तेव्हा सुद्धा बीड रेल्वे यांसह बीड जिल्ह्यातील विकासकामांच्या संदर्भातच दादांनी श्री मुंडे यांच्याशी चर्चा केली होती.

## बीडमध्ये वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यास अभिवादन

# वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राला प्रगतीच्या वाटेवर नेले -डॉ.सारिकाताई क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी
माजी मुख्यमंत्री आणि हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक हे दूरदृष्टी असलेले नेते होते. त्यांनी शेतीच्या क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून खऱ्या अर्थाने महाराष्ट्राला प्रगतीच्या वाटेवर नेले, असे प्रतिपादन ‘कल्पतरू’च्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले. दूरदृष्टी, लोकाभिमुख राजकारणाच्या मदतीने प्रगत व पुरोगामी महाराष्ट्र घडवण्यासाठी झटणारे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक यांना जयंतीनिमित्त सोमवारी (दि.१) बीड शहरातील त्यांच्या पुतळ्यास अभिवादन केले.

पुढे बोलताना डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी जयंतीनिमित उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. तसेच, यानिमित्ताने साजऱ्या केल्या जाणाऱ्या कृषी दिनानिमित्त सर्व शेतकरी बांधवांनाही कृषी दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



याप्रसंगी जिल्हा रुग्णालयाचे अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.नागेश चव्हाण, राज्य महिला आयोगाच्या सदस्या ड.संगीता चव्हाण, गंगाधर घुमरे, बाबुराव जाधव, भूषण पवार, संतराम राठोड, सुशील पवार, लहू चव्हाण, विजय चव्हाण, आबासाहेब राठोड, बाबासाहेब चव्हाण, अर्जुन चव्हाण यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी, प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# हरित क्रांतीचे प्रणेते , महानायक, वसंतरावजी नाईक साहेब यांच्या १११ व्या जयंतीनिमित्त

## श्री अर्जुन चव्हाण (कृषी पर्यवेक्षक,शासकीय फरोवा,राजुरी.न. ता.जी.बीड)

वसंतराव नाईक यांचा जन्म १ जुलै १९१३ रोजी बंजारा समाजात सौ.हुंणकाबाई व फुलसिंग नाईक या दांपत्या पोटी मौजे गहुली ता.पुसद जि.यवतमाळ या ठिकाणी झाला. वसंतराव नाईक यांचे आजोबा चतुरसिंग (राठोड) नाईक यांनी हे गाव वसवले होते. चतुरसिंग हे तांडयाचे प्रमुख*असल्या कारणाने लोक त्यांना नाईक म्हणत.

वसंतराव नाईक यांचे बालपण गहुली या गावी गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण हे सभोवतालच्या गावी, पोहरा देवी, उमरी, भोजला, बान्सी, या ठिकाणी झाले. जे की, आज पोहरा देवी हे जगातील बंजारा समाजाचे अराध्य दैवत म्हणून ओळखले जाते. त्या काळी वाहनाची सोय नसल्यामुळे दररोज चार-पाच मैल चालत जावून येणे, मोठया जिद्दीने व कष्टाने त्यांनी शिक्षण घेतले. लहानपणापासून चाणाक्ष बुध्दी व वाक्पटुता यामुळे पुढील व्यक्तीवर चांगला प्रभाव पडत असे. नाईक साहेब यांना क्रिकेट या खेळाची खुप आवड होती. शिलबंद गळ्याचा कोट त्यांना खुप आवडत.

सन १९३३ मध्ये नाईक साहेब यांनी निलसिटी विद्यालय, नागपूर येथून मॅट्रीक परिक्षा उत्तीर्ण झाले. पुढे त्यांनी मॉरीस कॉलेज नागपूर येथून बी.ए. पदवी पर्यंत शिक्षण घेवून १९३७ मध्ये बी.ए. पदवी ही संपादन केली. त्यानंतर नागपूर शहराचा प्रभाव नाईक साहेबांच्या जीवनात फार महत्वाचा ठरला. तेथे त्यांच्यात अमुलाग्र बदल होत गेला. वाचनाची उदंड आवड असल्यामुळे महात्मा फुले व अन्य समाजसुधारकाचे वाचन त्यांनी केले. पुढे १९४० साली नागपूर विधी महाविद्यालयातून एल.एल.बी. ही पदवी संपादन केली. सन १९४१ साली प्रख्यात वकील कै.बॅरिस्टर पंजाबराव देशमुख यांच्या बरोबर व नंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुसद येथे स्वतंत्र वकीली व्यवसाय सुरू केला. वकीली व्यवसायात त्यांनी दीनदुबळया, दलीत गोरगरीबांना मदतीचा हात देवून विविध अडचणीतून बाहेर काढण्याचे प्रयत्न केले व त्यांना त्यात यश आले. डॉ.पंजाबराव देशमुख या नेत्याच्या मार्गदर्शनाखाली एक धडाडीचा समाजकार्यकर्ता म्हणून वसंतराव नाईक साहेबांची ओळख संपूर्ण यवतमाळ जिल्हयात पसरली.

आंतरजातीय विवाह :-

महाविद्यालयीन जीवनामध्ये त्यांचा घाटे या ब्राम्हण समाजातील कुटूंबाबरोबर चांगले संबंध निर्माण झाल्यामुळे वयाच्या २८ व्या वर्षी त्यांनी कु.वत्सला घाटे या ब्राम्हण समाजातील मुलीबरोबर दि.६ जुलै १९४१ रोजी नोंदणी पध्दतीने विवाह केला. आणि जीवनातील पहिली क्रांती वसंतरावांनी केली. त्याकाळी आंतरजातीय विवाह आणि नोंदणी पध्दतीने विवाह केला, यालाच क्रांती म्हणावी लागेल. बंजारा समाजातील असणार्या अनिष्ठ रूढी-परंपरा यात बदल घडवून आणण्यासाठी वसंतरावांनी पुढाकार घेतला.

राजकीय प्रवास:-

वसंतरावजी नाईक साहेबांनी अल्पावधीत वकीली व्यवसायात प्रसिध्दी मिळाल्यामुळे बॅ.पंजाबराव देशमुख यांच्या मार्गदनाखाली कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. सन १९४३ मध्ये तालुका कॉंग्रेस समितीचे ते अध्यक्ष झाले. १९४६ मध्ये त्यांनी पुसद नगर पालिका निवडणूक लढविली. व त्यात विजयी होवून त्यांची पुसद नगरपालीकेचे नगराध्यक्ष म्हणून निवड झाली.

सन १९४६ ते १९५२ हया काळात ते पुसद नगर पालीकेचे नगराध्यक्ष होते. देशाच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूका १९५२ मध्ये पार पडल्या. १९५२ मध्ये वसंतरावजी नाईक साहेब हे पुसद मतदार संघातून निवडणून आले. पण हा मतदार संघ मध्यप्रदेशात येत असल्यामुळे त्यांना त्या राज्यात मंत्रीमंडळात महसुल खात्याचे उपमंत्रीपद दिले गेले. नंतर १९५६ च्या राज्य पुनर्रचनेनंतर भाषावार प्रांतरचना नुसार मराठवाडा, विदर्भ व जुनी मुंबई (महाराष्ट्र) या राज्यात यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रीमंडळात सहकार कृषी व दुग्ध व्यवसाय या खात्याचे मंत्री झाले. १९५७ साली दुसर्या पंचवार्षीक निवडणूकीत ते पुसद या मतदार संघातून दुसर्यांदा निवडणून आले. व मंत्रीमंडळात कृषिमंत्री म्हणून काम पाहिले.

दि.३ सप्टेबर १९६० रोजी वडील फुलसिंग चतुरसिंग नाईक यांचे निधन झाले. मुंबईहून वाहनाचा ताफा निघाला. दुष्काळ जानवत होता. शेतकर्यांना वाटेत भेटत होते. व त्यांची शेतीबाबत विचारपूस करत होते. साहेबांनी गोरगरीब, दीन-दलीत, दुबळया मुलांना उच्च शिक्षण मिळावे, आणि ते पुसद या ठिकाणी मिळावे, म्हणून १९६० मध्ये त्यांनी जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. दि.२८ जुन १९६१ रोजी जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित फुलसिंग नाईक कॉलेजची स्थापना करून ग्रामीण भागातील मुलांना उच्च शिक्षणाची संधी मिळवून दिली. दि.१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची नवनिर्मिती झाली. व वसंतरावजी नाईक साहेब हे पहिले महसूल झाले९ बनले. या काळात कमाल जमीनधारणा संबंधी कायदा संमत केला. वर्षानुवर्षे जनीनदाराकडे हजारो हेक्टर जमीन पडून असल्याची खात्री केली. त्या जमीणीचे उत्पादन क्षमता वाढावी व शेतकर्यांना त्याचा अधिकार मिळावा. हा कायदा तयार करणारे आणि अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.

नाईक साहेब जिल्हा निर्मीतीचे शिल्पकार :-

वसंतरावजी नाईक समितीच्या शिफारशीवरून जिल्हयाचे कामकाज पाहण्यासाठी त्रिस्तरीय योजना अंमलात आली. जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हा परिषद, तालुक्याच्या ठिकाणी पंचायत समिती, आणि गावाच्या ठिकाणी ग्रामपंचायत, ग्रामीण भागातील लोकांना वाव मिळावा, लोक सरकारच्या कारभारात सामील व्हावेत, हा उद्देश ठेवून नाईक साहेबांनी जिल्हा परिषदेमध्ये लोकांच्या अडीअडचणी समजून घेणारा प्रतिनिधी म्हणून जिल्हा परिषद अध्यक्ष हा लोकांमधून निवडून येणारा सदस्य असावा. तसेच तालुकास्तरावर तालुक्याच्या अडचणी समजून घेणारा पंचायत समिती सभापती हा लोकांमधून निवडणून आलेला सदस्य असावा. तसेच गावपातळीवर गावाचा कारभार पाहण्यासाठी सरपंच हा लोकांमधुन निवडणून येणारा सदस्य असावा, म्हणजे जिल्हा, तालुका, आणि गावस्तरावरील अडीअडचणी सोडवून गावांचा विकास साधता येईल. अशी नाईक साहेबांनी शिफारस केली आणि केंद्राने सुध्दा सदर शिफारस स्विकारली. व इतर राज्यात लागू केले.

सन १९६२ मध्ये तिसर्या पंचवार्षीक निवडनुकीमध्ये वसंतरावजी नाईक साहेब विधान सभेवर निवडून गेले. याच काळात चीन आणि भारत युध्द चालू असल्यामुळे केंद्रामध्ये यशवंतराव चव्हाण यांना केंद्रात संरक्षणमंत्री पदी पाचारण करण्यात आले. त्यामुळे पुढील मुख्यमंत्री कोण

अशी चर्चा कॉंग्रेस पक्षश्रेष्ठीत सुरू झाल्यानंतर ज्येष्ठतेनुसार महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री म्हणून दादासाहेब कन्नमवार यांची निवड करण्यात आली. दुर्दैवाने कन्नवार यांचे एक वर्षाच्या आत दुख:द निधन झाले. पुन्हा एकदा मुख्यमंत्री निवडीसाठी चर्चेला उधाण आले. पक्षश्रेष्ठीच्या निवडीनुसार सर्वानुमते वसंतरावजी नाईक साहेब यांचे नाव समोर आले.

महाराष्ट्राचे तिसरे मुख्यमंत्री म्हणून दि.५ डिसेंबर १९६३ रोजी वसंतरावजी नाईक साहेबांनी मुख्यमंत्री पदाची पहिली शपथ घेतली. महाराष्ट्राची धुरा संभाळत असतांना तेव्हाचा काळ अडचणीचा होता. १) भारतावर दोनवेळा आलेला युध्दाचे संकट (चीन आणि पाकिस्तान) २) कोयनेचा भुकंप (११ डिसेंबर १९६६) त्यानंतर १९७२ अशी संकटाची मालीका झेलत असतांना वसंतरावजी नाईक साहेबांनी संकटाना आव्हान समजून प्रगतीच्या वाटेवर नेली. दुष्काळाच्या काळात जनता अन्नास मोताल झाली होती. आणि सगळीकडे अन्नावाचून भूकबळीचे प्रमाण वाढत होते. वसंतरावांनी महाराष्ट्र अन्नधान्न स्वयंपूर्ण करण्याची भीष्मप्रतिज्ञा घेतली. पुण्याच्या शनीवार वाडयासमोर दि.३ ऑक्टोबर १९६५ रोजी भल्यामोठया सभेत त्यांनी घोषणा केली.ङ्ग येत्या दोन वर्षात महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला नाही तर जाहीरपणे फाशी घेईल . त्यांच्या या घोषनेनंतर टीका टिपण्णी झाली. मात्र यामधून प्रशासन आणि शेतकर्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. अन्नधान्याची गरज पूर्ण करण्यासाठी भरघोष उत्पादन देणार्या हायब्रिड ज्वारीच्या वाणाला त्यांनी प्रोत्साहन दिले.

या संकरीत वाणाचा प्रयोग त्यांनी स्वत: सेलु येथील शेतीत केला. शुभ्रदाण्यानी लगडलेली हातभर लांबीची कणसे पाहून शेतकर्यांची डोळे भारावून आले. एखाद्या झपाटलेल्या शास्त्रज्ञाप्रमाणे वसंतराव शेतकर्याच्या बांधावर पोहोचले.मुख्यमंत्राच्या गाडयांचा ताफा रस्त्यात थांबवून रस्तेलगतच्या शेतात संक्रीत ज्वारीच्या वाणाचा प्रचार आणि प्रसार केला. भरघोष पीक काढणार्या शेतकर्याच्या पाठीवरून शाबासकीची थाप टाकत असत. पाण्याच्या बाबतीत ते नेहमी म्हणत, तुम्ही शेतीला काहीही करून पाणी द्या, ती भिजवा, धरणाच्या पाण्याने, विहिरीने, नाल्याचे पाणी द्या, ओंजळीने पाणी द्या. हेही होत नसेल तर घाम गाळून का होईना शेती भिजवा. नाईक साहेब नेहमी *शेतकर्यांना स्फूर्ती व प्रेरणा देत असत.

मराठी भाषेला राजभाषचा दर्जा- महाराष्ट शासनाची राजभाषा मराठी असल्याची घोषणा वसंतरावजी नाईक साहेबांनी १ मे १९६६ साली केली.सन १९६७ साली चौथ्या पंचवर्षीक निवडणूकीत पुसद तालुक्यातून चौथ्यार्यांदा वसंतराव नाईक साहेब विधानसभेवर निवडणून गेले. मुख्यमंत्र्याच्या कारकीर्दीत चांगले काम केल्यामुळे कॉंग्रेस पक्षाच्या वतीने २०२ आमदार निवडून आणले. व १९७२ च्या निवडणूकीत २२२ आमदार निवडून आले. ही किमया आजपर्यंतच्या एकाही पक्षाला साधता आली नाही, ती वसंतरावजी नाईक साहेबांनी करून दाखविली.

दि.६ मार्च १९६७ ला दुसर्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर साहेबांनी शेतकर्यांसाठी खुप मोठे कार्य केले. १) शेतकर्यांच्या समस्या, शेतीच्या येणार्या अडचणी महाराष्ट्राचे हवामानानुसार मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र या भागातील शेतकर्यांना समान न्याय, वेळेवर तिन्ही हंगामात मार्गदर्शन मिळावे, तसेच संशोधन होवून नवनवीन प्रयोग व्हावे. यासाठी चारही विभागात चार कृषि विद्यापीठे मुख्यमंत्री असतांना दिले व उल्लेखनीय कार्य केले.

२) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी- सन १९६९.

३) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, सन १९७१.

४) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली- सन १९७२.

५) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी- १९७२. समान न्याय देणारे कृषि विद्यापीठ देवून वसंतरावजी नाईक साहेब शेतकर्यांचे दैवत झाले. आज या विद्यापीठातून हजारो विद्यार्थी शेतीविषयक शिक्षण घेवून प्रशासनात, शेती, व्यवसायात प्रगती केलेली आहे, ही नाईक साहेबांची देण आहे.

६) एकाच वेळेस पन्नास लाख लोकांना रोजगार हमी योजनेत काम देवून योजना राज्यात राबविली. सदर योजना केंद्रात महात्मा गांधी रोजगार हमी योजना नावाने चालू आहे.

७) कोरडवाहू शेतीला सिंचनाची जोड म्हणून पाणी अडवा पाणी जिरवा या मूलमंत्राचा पुरस्कार करून शेतात बांध टाकून पाणी अडवले व शेतीपुरक उद्योगाला चालना दिली.कुकूटपालन, पशूपालन, दुधउत्पादन या सारख्या प्रयोगाचे धडे स्वत:च्या सेलु येथील शेतीमधून दिले.

८) गोरगरीबांच्या मुलांसाठी जिल्हानिहाय आश्रमशाळा काढून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले.

सन १९७२ च्या पंचवार्षीक निवडणूकीत पाचव्यांदा विधानसभेवर निवडून गेले व दि.१४ मार्च १९७२ रोजी तिसर्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. या काळात शेतकर्यांची होणारी दलालापासून होणारी पिळवणूक थांबण्यासाठी सन १९७२ ला कापूस एकाधिकार योजना अंमलात आणली. १९७७ मध्ये वाशिम लोकसभा मदतार संघातुन लोकसभेवर खासदार म्हणून निवडून गेले. तसेच बिहारचे राज्यपाल पद पण त्यांनी नाकारले, कारण त्यांना महाराष्ट्राची सेवा करायची होती.

महाराष्ट्र अंधारमुक्त करण्यासाठी औष्णिक प्रकल्प-कोरडी, खापरखेडा, तसेच पारस आणि परळी वीज केंद्राची सुरूवात नाईक साहेबांच्या काळात झाली. तसेच उजनी धरण, जायकवाडी धरण, आरुणावती, अप्पर वर्धा, या धरणाची कामे नाईक साहेबांच्या काळात झाली.

अशा महामानवाचा दि.१८ ऑगस्ट १९७९ साली वयाच्या ६६ व्या वर्षी सिंगापूर येथे काळाने झडप घातली. एका वादळाच्या वंशाजाचा झाला झाला. २० ऑगस्ट १९७९ रोजी गहुली या गावी अंत्यदर्शन आणि अंत्यसंस्कार करण्यात आले. आशा महान कार्य करणाऱ्या मुख्यमंत्री वसंतराव नाईक साहेबांना १११ व्या जयंती निमित्त कोटी- कोटी विनम्र अभिवादन

**श्री अर्जुन जनार्धन चव्हाण**
कृषि पर्यवेक्षक, शसकीय फळरोपवाााटिका
राजुरी(न.) ता.जि.बीड
महाराष्ट्र शासन कृषी विभाग सर्वोच्च पुरस्कार प्राप्त..
पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील
कृषी सेवा रत्न पुरस्कार
जिल्हा अध्यक्ष:- महाराष्ट्र राज्य वसंतराव नाईक
अधिकारी-कर्मचारी संघटना, बीड.
कोषाध्यक्ष :-महाराष्ट्र राज्य कृषी पर्यवेक्षक
संघटना, बीड जिल्हा
९४२३६९१०४९,९१४६१५२००८

## चौसाळा येथिल गणपत लक्ष्मण ढोकणे यांचे अल्पशा आजाराने निधन

बीड ।प्रतिनिधी



बीड तालुक्यातील चौसाळा येथिल रहीवाशी गणपत लक्ष्मण ढोकणे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले ते वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा सचिव प्रकाश ढोकणे यांचे वडील असुन त्यांच्या पश्चात चार मुले एक मुलगी असा परिवार असुन ढोकणे परिवाराच्या दु:खात सायं दैनिक-महाराष्ट्र आरंभ परिवार सहभागी आहे.



किल्ले धारूर कॅ. राजपालसिंह हजारी इंग्लिश स्कूल येथे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी यांचा १११वा मन कि बात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या वेळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगराध्यक्ष डॉ.स्वरूपसिंह हजारी साहेब , शहराध्यक्ष दत्ताभाऊ धोत्रे , नगर सेवक बाळासाहेब खामकर, सचिन दुबे, सुरेश लोकरे, रोहनसिंह हजारी व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## बीड जिल्ह्यातील पत्रकारिता क्षेत्रा सोबत रेल्वे संघर्ष समिती पोरकी झाली -माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**आज सकाळी जेव्हा मला चँपावतीपत्राचे जेष्ठ संपादक नामदेवराव दादा क्षीरसागर यांच्या निधनाची बातमी कळली तेव्हा धक्का बसला नामदेवराव दादांचे आणि आम्हा क्षीरसागर परिवाराचे गेली पाच दशके अतिशय जिव्हाळ्याचे सबंध आलेले आहेत अनेक वेळा त्यांनी आम्हाला वडिलकीच्या नात्याने मार्गदर्शन केले आहे**

स्व काकूंनच्या आणि माझ्या राजकीय कारकिर्दीत मार्गदर्शन करण्याचा त्यांचा मोलाचा वाटा आहे बीड जिल्ह्यातील रेल्वे प्रश्न नामदेवराव यांनी उभा केलेल्या रेल्वे संघर्ष समितीच्या माध्यमातून गेली तीस वर्षे चालू आहे राज्यातील आणि केंद्रातील कोणतेही सरकार आसो बीड जिल्ह्याच्या रेल्वे प्रश्नी नामदेवराव यांनी त्या त्या सरकारला निवेदने देऊन आंदोलने करून जिल्ह्याच्या जिव्हाळ्याचा रेल्वे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला आहे चँपावतीपत्रचे संपादक म्हणून त्यांनी केलेले काम पत्रकारिता क्षेत्रांत नव्याने येणाऱ्या तरुणांना प्रेरणादायी ठरणारे आहे नामदेवराव यांच्या निधनाने जिल्ह्यातील पत्रकारिता जशी पोरकी झाली आहे तशी रेल्वे संघर्ष समिती सुद्धा पोरकी झालेली आहे नामदेवराव दादा यांच्या जाण्याने पत्रकारिता क्षेत्राला आणि त्यांच्या क्षीरसागर कुटुंबियांची जी हानी झालीय ती कधीही भरून न येणारी आहे,स्व नामदेवराव यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो चंपावतीपत्र आणि नामदेवराव क्षीरसागर यांच्या कुटुंबियांना हे दुःख झेलण्याचे बळ देवो त्यांच्या दु:खात मी सहभागी आहे असे माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी शोक संदेशात म्हटले आहे

## परळी बस स्थानकात आत व बाहेर रिक्षा चालकांनी निर्लज्ज पणाचा गाठला कळस!

### मेन रोडवर अस्ताव्यस्त पार्किंग

परळी ।प्रतिनिधी

परळी शहरात वाहतूक कोंडीमुळे प्रवास करण्यास बराच वेळ जातो, आर्थिक प्रगती मंदावते, रस्त्यावरील किरकोळ भांडणे वाढतात, वाहन चालकांची चिडचिड वाढते, वाहनांचे इंधन मोठ्या प्रमाणावर जळते. ज्यामुळे ध्वनी आणि वायू प्रदूषण वाढते. दुचाकी स्वार हे भरधाव वेगात चालत असतात छोटे छोटे अपघात दररोज बसस्थानका समोर पहावयास मिळत आहेत

दुचाकी स्वाराना गंभीर इजा होत असून भांडण तंटा हाणामारी यांचे प्रमाणात वाढ झाली असून या वाहतूक कोंडीला जबाबदार कोण?वाहतूक कोंडी का होते याचा आपण गांभीर्याने विचार केला पाहिजे.जनमानसात असा समज असा आहे की रस्ते अरुंद, चौकात पोलिस उभे नसल्यास, वाहन चालकाच्या बेशिस्त वागणुकीने होते,मोठ्या,अवजड,माल-वाहतूक वाहना मुळे,बस,रिक्षा मुळे, फूटपाथ वाढविल्यास, गती रोधकांमुळे, फूटपाथ वरील अतिक्रमणाने बस थांब्यामुळे अडसर , फळा ची गाडे हॉटेल समोरील दुकाना समोरील वाहन पार्किंग मुळे वाहतूक कोंडी होतअसून याकडे पोलीस प्रशासन ठोस भूमिका कधी घेणार आटो चे हप्ते घेत सोयीनुसार, हेतू पुरस्पर आणि अनावधानाने दुर्लक्ष करत आहेत की काय आणि जे सर्वात महत्वाचे आहे

वाहतूक कोंडीस धुतरफा पार्किंग काढून घेणे,रोडवरील अतिक्रमण उठवणे, यावर प्रतिबंध कधी होणार परळी शहर पोलीस प्रशासन म्हणजे साप सोडून जमीन बडविणे!जिकडे आर्थिक फायदा तिथं दाखवतात कायदा,अवैध खाजगी वाहनांना मोकळीक देणे म्हणजे वड्याचे तेल वांग्यावर काढणे असे म्हणावं लागेल !




**बसस्थानकातून रिक्षात भाडे भरणे चालू पोलीस प्रशासन व परिवहन अधिकारी अंध भूमिकेत!**

## नव महाराष्ट्र घडविण्यात वसंतराव नाईक यांचा सिंहाचा वाटा - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या जडण-घडणीत महाराष्ट्र राज्यातील अनेक महान नेत्यांचा व महापुरूषांचा हातभार लागलेला असुन महाराष्ट्र सुजलाम सुफलाम करण्यासाठी अनेक मान्यवरांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये कृषी क्षेत्र रोजगार हमी योजना, पंचायत राज व्यवस्था यांची प्रभावी अंमलबजावणी करून गरीब, शेतकरी, कष्टकरी, कामगार या घटकांसाठी त्यांना हक्काच्या योजना सुरू करून राज्याला पुढे नेण्याचे आणि नव महाराष्ट्र घडविण्यात महाराष्ट्राचे सर्वाधिक मुख्यमंत्री पदी राहणारे स्व.वसतराव नाईक यांचा सिंहाचा वाटा होता असे गौरोद्गगार माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

वसंतराव नाईक अधिकारी कर्मचारी संघटना बीड व तमाम बंजारा बांधव यांच्या वतीने बीड शहरातील वसंतराव नाईक पुतळ्यासमोर कृषी दिनानिमित्त व वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. सर्व प्रथम माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पन करून अभिवादन करण्यात आले. बंजारा समाज संपूर्ण भारतभर पसरलेला असुन या समाजाची कष्टकरी समाज म्हणून ख्याती आहे. उसतोडणी करणारा समाज म्हणून असणारी ओळख पुसण्यासाठी समाजातील सुशिक्षीत व समजदार तरूणांनी समाज परिवर्तन करणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात हा समाज राजकीय क्षेत्रात पण पुढे असुन वसंतराव नाईक, सुधाकर नाईक, मनोहर नाईक, निलय नाईक, धोंडीराम राठोड, सखाराम पवार, सवाईराम जाधव, ना.संजय राठोड असे



महान व्यक्ती होवून गेले व काहीजण महाराष्ट्रात काम करत आहेत.

येणार्या काळात नाईक साहेबांच्या पुतळ्याच्या सुशोभीकरण करणे व छतासाठी आपण निधी देऊन मदत करू असे आश्वासन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी दिले. यावेळी राज्य महिला आयोगाच्या सदस्या संगिता चव्हाण, माजी जि.प.उपाध्यक्ष गंगाधर घुमरे, जिल्हा अतिरीक्त शल्यचिकित्सक नागेश चव्हाण, माजी सभापती बाबुराव जाधव, बंजारा समाजाचे जिल्हाध्यक्ष अंकुश राठोड, विमुक्त भटक्या सेलचे भुषण पवार, आश्रमशाळेचे सचिव सुशिल पवार, वसंतराव नाईक संघटनेचे जिल्हा मार्गदर्शक बाबासाहेब चव्हाण, जिल्हाध्यक्ष अर्जुन चव्हाण, कार्याध्यक्ष प्रा.जगन्नाथ चव्हाण, उपाध्यक्ष शिवलाल राठोड, प्राचार्य राजेशकुमार राठोड, प्रा.बंडु राठोड, मु.अ.लहु चव्हाण, कैलास राठोड, तालुकाध्यक्ष प्रकाश आडे, उपाध्यक्ष विष्णू राठोड, सचिव श्रीमंत चव्हाण, ज्ञानेश्वर राठोड, इंजि.गुलाब राठोड, सचिन पवार, सरपंच स्वरूपराव राठोड, माजी सरपंच बाबुराव राठोड यांच्यासह समाजातील डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बांधव यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खानदेशातील प्रतिष्ठित असे खानदेश स्टार पुरस्काराने पटेल जहाँआरा सन्मानित

## वर्ष २०२४ आदर्श शिक्षिका पुरस्कारासाठी पटेलांची निवड

खानदेश स्टार पुरस्कार कमिटी तर्फे शिक्षणातील उत्कृष्टतेच्या एका महत्त्वपूर्ण उत्सवात, शिक्षिका श्रीमती पटेल जहाँआरा अब्दुल मुनाफ यांना खानदेशातील प्रतिष्ठित आदर्श शिक्षिका २०२४ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. ही योग्य ओळख पटेल जहाँआरा यांची त्यांच्या विद्यार्थ्यांप्रती असलेली अतूट बांधिलकी आणि शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या अपवादात्मक योगदानावर प्रकाश टाकते. पटेल जहाँआरा यांचा अध्यापन प्रवास नावीन्यपूर्णता, करुणा आणि त्यांच्या विद्यार्थ्यांच्या गरजा समजून घेण्याचा आहे. जिथे विद्यार्थ्यांना एक्सप्लोर करण्यासाठी, शिकण्यासाठी आणि वाढण्यास सक्षम वाटते. त्यांची सर्जनशील शिकवण्याच्या पद्धती आणि वैयक्तिक दृष्टिकोनाने तिने तिच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक अनुभव बदलला आहे. पटेल जहाँआरा यांच्या उल्लेखनीय गुणांपैकी एक म्हणजे त्यांच्या विद्यार्थ्यांशी प्रगल्भ पातळीवर संपर्क साधण्याची त्यांची क्षमता. त्यांची अद्वितीय शक्ती, आव्हाने आणि आकांक्षा समजून घेण्यासाठी वेळ काढते, त्यांचे धडे त्यांच्या वैयक्तिक गरजा पूर्ण करतात याची खात्री करून घेते. त्यांचे खरी काळजी आणि समर्थन एक सुरक्षित आणि सर्वसमावेशक वातावरण तयार करते जिथे प्रत्येक विद्यार्थ्याला त्यांच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्यासाठी मोलाची आणि प्रेरणा मिळते.



वर्गाच्या पलीकडे, पटेल जहाँआरा यांचा प्रभाव व्यापक समाजात पसरलेला आहे. ते विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये, कार्यशाळा, चर्चासत्रे आणि सामुदायिक आउटरीच कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतेत. त्यांचे विद्यार्थी आणि समाजाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे त्यांचे समर्पण खरोखरच प्रशंसनीय आहे. त्यांचे शिकवण्याच्या तत्त्वज्ञानाबद्दल विचारले असता, पटेल जहाँआरा नम्रपणे सांगतात, शिक्षण हे केवळ ज्ञान देणे नाही तर ते संपूर्ण मुलाचे पालनपोषण आहे. मी शिकण्याची आवड, गंभीर विचार कौशल्ये आणि माझ्यात सहानुभूतीची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करते. प्रत्येक विद्यार्थी यशस्वी होण्यासाठी समान संधी मिळवण्यास पात्र आहे आणि मी ते देण्यासाठी वचनबद्ध आहे. खानदेशातील आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ हा पटेल जहाँआरा अब्दुल मुनाफ यांच्या शिक्षणातील अतुलनीय योगदानाचा दाखला आहे. त्यांचे विद्यार्थी सातत्याने उल्लेखनीय शैक्षणिक परिणाम प्राप्त करतात, त्यांचे शिकवण्याच्या पद्धतींची प्रभावीता दर्शवितात. तथापि, पटेल जहाँआरा यांचा प्रभाव शैक्षणिक यशापलीकडे जातो. त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, लवचिकता आणि मजबूत नैतिक होकायंत्राची तहान निर्माण करते, त्यांना उद्याचे जबाबदार आणि दयाळू नागरिक बनण्यासाठी तयार करते. आपण पटेल जहाँआरा यांची योग्य ओळख साजरी करत असताना, तरुण मनांना आकार देण्यासाठी आणि भावी पिढ्यांना प्रेरणा देण्यासाठी अथक परिश्रम करणाऱ्या अगणित शिक्षकांचीही आपण प्रशंसा करूया. त्यांचे समर्पण आणि उत्कटता आपल्या समाजाच्या उज्ज्वल भविष्याचा पाया आहे. शेवटी, पटेल जहाँआरा यांचा आदर्श शिक्षिका पुरस्कार २०२४ हा त्यांच्या असामान्य अध्यापन क्षमतेचा आणि त्यांच्या विद्यार्थ्यांप्रती असलेल्या अतूट बांधिलकीचा दाखला आहे.

पटेल जहाँआरा हे अँग्लो उर्दू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, येवला, जिल्हा नाशिक येथील माजी मुख्याध्यापक मरहुम हाजी अब्दुल मुनाफ अब्दुल मजीद यांचे कन्या आहेत.धुळे जिल्हा प्राथमिक आरोग्य केंद्रातील माजी वरिष्ठ सहाय्यक हाजी गुलाब नूर मुहम्मद पटेल यांचे सुन आहेत.व धुळे येथील मराठी शिक्षक सलिम हाजी गुलाब पटेल यांचे पत्नी आहेत.

# जि.प.प्रा.शाळा संगम येथे शिक्षक पालक मेळावा उत्साहात संपन्न



परळी ।प्रतिनिधी

जि प प्रा शा संगम शाळेत आज दि २९ जून २४ रोजी शिक्षक पालक मेळावा नुतन परळी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री यादव पल्लेवाड,ह भ प रामेश्वर महाराज कोकाटे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नवनाथ नागरगोजे ,मुख्याध्यापक अशोक नावंदे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित मान्यवर व पालकांचे स्वागत शाळेच्या वतीने करण्यात आले.प्रास्तविक मुख्याध्यापक अशोक नावंदे यांनी करताना बैठकीच्या आयोजना बाबत व विध्यार्थी लाभाच्या योजना बद्दल माहिती सांगितली . केंद्रप्रमुख श्री पल्लेवाड यांनी शाळेच्या विकासासाठी पालकांची भूमिका महत्त्वाची आहे असे सांगितले व विध्यार्थी विविध शिष्यवृत्ती योजना बाबतची माहिती सांगून असाक्षर पुरुष,महिलांना साक्षर करण्याची जबाबदारी शाळा मुख्याध्यापक,शिक्षक यांच्यासह कुटुंबातील सदस्य यांनी घेऊन सप्टेंबर अखेर सर्वांना साक्षर करावे असे आवाहन केले. पालकांच्या वतीने ह भ प रामेश्वर महाराज कोकाटे यांनी शाळेला सर्वोत्तपरी सहकार्य करण्याचे व असाक्षरांना वही, पेन व उजळणी पुस्तक वाटप करण्याचा मनोदय व्यक्त करून शाळेत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले.यावेळी पालक मोठया संख्येने उपस्थित होते. मेळावा यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक सर्वश्री महादेव गित्ते सर ,सुभाष कोंकेवाड सर,शिक्षिका श्रीमती कल्पना बडे मॅडम व बबिता शिंदे मॅडम यांनी परिश्रम घेतले.


# आवश्यक तोंड उघडत नसताना शस्त्रक्रियेविना काढली दाढ व मूळ

## अवघड व किचकट प्रक्रियेनंतर डॉ. मोमीन यांनी केले रुग्णाला त्रास मुक्त

**बीड ।प्रतिनिधी**

**शहरातील मोमीनपुरा भागात असलेल्या ए.के. डेंटोफेशियल या रुग्णालयाचे संचालक डॉ. मोमीन फजलुल्लाह मुहम्मद मुस्तफा यांनी एका रुग्णाचे तोंड आवश्यक प्रमाणात उघडत नसतानाही मोठ्या कुशलतेने अवघड व किचकट प्रक्रियेनंतर शस्त्रक्रियेविना दाढ व मूळ काढून रुग्णाला त्रास मुक्त केले आहे. यामुळे रुग्णाने डॉक्टरांचे आभार व्यक्त केले आहे.**

दाढ दुखत असताना रुग्णाचा जीव अक्षरशः कासावीस होतो. हा त्रास दूर करण्यासाठी काय करावे आणि काय नाही असे होऊन जाते. त्यातही दुखरी दाढ काढण्याकरिता साधारण २० ते २५ एमएम तोंड उघडणे आवश्यक असते परंतु दाढ दुखणाऱ्या शेख सलीम इमामुद्दीन या रुग्णाचे तोंड फक्त १० एमएम उघडत होते. एवढे कमी तोंड उघडत असेल तर रुग्णाची शस्त्रक्रिया करून दाढ काढावी लागते परंतु एवढ्या कमी प्रमाणात तोंड उघडत असूनही शहरातील मोमीनपुरा भागात असलेल्या ए.के. डेंटोफेशियल या रुग्णालयाचे संचालक डॉ. मोमीन फजलुल्लाह यांनी मोठ्या अवघड व किचकट प्रक्रियेनंतर शस्त्रक्रियेविना संबंधित रुग्णाची



दाढ व मूळ यशस्वीरित्या काढले आणि रुग्णाला त्रास मुक्त केले. यामुळे रुग्ण शेख सलीम इमामुद्दीन यांनी ए.के. डेंटोफेशियल चे अनुभवी डॉ. मोमीन फजलुल्लाह आणि डॉ. अब्दुल खादर अन्सारी यांचे आभार व्यक्त केले आहे.

# कृषीमंत्री धनंजय मुंडेंच्या बीड जिल्ह्यातच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबिय शासकीय मदतीपासून वंचित

## गेल्या ६ महिन्यातील १०३ शेतकरी आत्महत्यांपैकी केवळ ८ शेतकरी कुटुंबियांनाच मदत-डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर

बीड ।प्रतिनिधी

कधी नैसर्गिक तर कधी प्रशासकीय धोरणांमुळे शेतकरी सातत्याने आर्थिक अडचणीत असुन मोठ्या प्रमाणात वाढलेला उत्पादन खर्च,खते बी -बियाणे यांच्या किंमतीत दिवसेंदिवस वाढ,शेती मालाला योग्य भाव न मिळणे.गतवर्षी जिल्ह्यात पेरण्या झाल्यानंतर पावसाने दगा दिला.काही भागात दुबार पेरणी करावी लागली. दुबार पेरणी केल्यानंतर हातातोंडाशी आलेला घास दुष्काळामुळे हिरावला.सरासरी पेक्षा पाऊस कमी पडल्याने मार्च महिन्यात विहिर, बोअरवेल,तलाव कोरडे पडल्याने शेतकऱ्यांना फळबागा मोडाव्या लागल्या.यामुळे कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांने नैराश्यातुन आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलले.१ जानेवारी २०२४ ते २८ जुन २०२४ या सहा महिन्यांच्या कालावधीत १०३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

यातील केवळ ८ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत मिळाली असुन ईतर मदतीपासून वंचित आहेत.त्यामुळे कृषी मंत्री महोदयांच्या बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांनाच वेळेवर मदत न मिळणे लाजीरवाणी बाब असुन तातडीने चौकशी प्रलंबित प्रकरणे मार्गी लाऊन मदत देण्यात यावी.तसेच उच्च न्यायालयाचे १५ दिवसात मदत मिळणे



बंधनकारक असताना सहा महिने मदत न मिळाल्याने प्रकरणे प्रलंबित ठेवण्यास जबाबदार आधिका-यांवर उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवमानना प्रकरणात प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१ जुलै सोमवार रोजी राज्यातील कृषीक्रांतीचे जनक माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषीदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, कृषीमंत्री धनंजय मुंडे, विभागीय आयुक्त यांना निवेदन देण्यात आले यावेळी आंदोलनात माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार,शेख मुबीन, शेख मुस्ताक,आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, जिल्हा सचिव रामधन जमाले,तालुका संघटक दत्तात्रय सुरवसे आदी सहभागी झाले होते.

सविस्तर माहितीस्तव

बीड जिल्ह्यात १ जानेवारी २०२४ ते २८ जुन २०२४ या मागील ६ महिन्यांच्या कालावधीत जानेवारी मध्ये १८, फेब्रुवारी मध्ये १४ , मार्च मध्ये १२ , एप्रिल मध्ये १३,मे मध्ये १४ , आणि जुन महिन्यात ३२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.यातील ५ शेतकरी मदतीस अपात्र ठरले असुन ५२ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे प्रस्ताव चौकशीसाठी अद्याप प्रलंबित आहेत तर ४६ शेतकरी शासनाच्या एक लाख रुपयांच्या मदतीस पात्र आहेत.मात्र त्यातील केवळ ८ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाच्या १ लाख रुपये मदतीचा निधी मिळाला आहे. त्यामुळे चौकशी अभावी मदतीपासून प्रलंबित प्रकरणे तातडीने मार्गी लाऊन तातडीने मदत देण्यात यावी.अशी मागणी करण्यात आली आहे.आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना १५ दिवसांच्या आत मदत मिळणे बंधनकारक असल्याचे उच्च न्यायालयाचे निर्देश असताना तातडीने मदत न मिळणे,वैद्यकीय अहवाल तातडीने सादर न करणे व प्रकरणात दिरंगाई केल्याबद्दल पोलिस निरीक्षक तसेच तहसिल प्रशासनातील अधिकाऱ्यांवर उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवमानना असुन चौकशी अभावी प्रलंबित प्रकरणात जबाबदार पोलिस प्रशासन तसेच तहसिल प्रशासनातील जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

# नामदेवराव क्षीरसागर यांच्या निधनाने जिल्हयाने ज्येष्ठ आणि अभ्यासू पत्रकार गमावला

## पंकजाताई मुंडे यांनी शोकभावना व्यक्त करत वाहिली भावपूर्ण श्रध्दांजली

बीड ।प्रतिनिधी

दैनिक चंपावतीपत्रचे संपादक नामदेवराव क्षीरसागर यांच्या निधनाने जिल्ह्याने एक ज्येष्ठ आणि अभ्यासू पत्रकार गमावला आहे, अशा शब्दांत भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी शोकभावना व्यक्त करत क्षीरसागर यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.ज्येष्ठ संपादक नामदेवराव क्षीरसागर यांच्या दुःखद निधनाने पत्रकारितेचे मोठे नुकसान झाले आहे. क्षीरसागर यांनी दैनिकाच्या माध्यमातून सर्व सामान्य माणसाला न्याय देण्याचे काम तर केलेच याशिवाय बीडला रेल्वे आणण्यातही त्यांचे योगदान महत्वाचे होते. संस्कार प्रबोधिनीच्या माध्यमातून शैक्षणिक चळवळ देखील त्यांनी उभी केली.बीड जिल्हा व मराठवाड्यातील जनसामान्यांच्या प्रश्नांना त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून वाचा फोडून न्याय मिळवून दिला. केवळ पत्रकारिताच नव्हे तर विविध संस्थांच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम त्यांनी केले. एक मनमिळावू आणि व्यासंगी संपादक म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांच्या निधनाने जिल्हा एका ज्येष्ठ व अभ्यासू संपादकाला मुकला असून पत्रकारितेची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, अशा शब्दांत पंकजाताई मुंडे यांनी शोकभावना व्यक्त केल्या.

# सुर्डी गावात घराचे खोदकाम करताना सापडले यादव कालीन नाणे!


आष्टी ।प्रतिनिधी

नवीन घराचे खोदकाम काम करण्यासाठी जुना वाडा पाडण्याचे काम चालू असताना मजूरांना चक्क यादव कालीन सुवर्ण नाणे आढळून आले.यात समातंर वाटाघाटी झाली नसल्याने प्रकरण तीन दिवसापुर्वी पोलीस ठाण्यात गेले.पोलिसही गावात दाखल झाले पण अद्याप नाणे किती,त्याचे काय झाले,याची कसलीही माहिती मिळाली दोन लोकांना चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलविण्यात आले आहे.

आष्टी तालुक्यातील सुर्डी गावात जानेवारी महिन्यात एका प्रतिष्ठित व्यक्तीला नवीन घराचे काम करण्यासाठी दुसर्याचा विकत घेतलेला वाडा फाडण्याचे काम चालू होते.याच दरम्यान तीन मजूर काम करताना भिंतीच्या देवळीत एक सुवर्ण नाणे भरून असलेली घागर आढळून आली.याच दरम्यान कसलाही बोभाटा झाला नाही. परंतू तीन दिवसापुर्वी वाटाघाटी समातंर झाली नसल्याने यातील एकाने ही माहिती आष्टी पोलिसांना दिल्यानंतर पोलीस अधिकारी चारचाकी वाहनासह गावात जाऊन आले. पाहणी केली पण काही आढळून आले नाही.मग हे नाणे कोणाला सापडले,किती सापडले,त्याचे काय झाले,याची चौकशी होणे गरजेचे आहे.

# महाराष्ट्र राज्य ऊसतोड कामगार मुकादम व वाहतूक संघटनेचा राज्य संघटक पदी बाप्पासाहेब भांगे

## ऊसतोड मजुरांच्या भावना सरकारपर्यंत फोहचवणारास अखेर संघटनेने दिले राज्य संघटक पद



वडवणी ।प्रतिनिधी

ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी मुलींसाठी, रात्र दिवस झगडणाऱ्या लोकपत्रकार बी भांगे यांना ऊसतोड कामगारांच्या संघटनेने राज्य संघटक व राज्य प्रसिध्दी प्रमूख हे पद दिलें आहे. ऊसतोड कामगाराचा मुलगा बाप्पासाहेब भांगे यांनी संघटनेची मशाल हातात घेतली असून अजुन एक ऊसतोड मजुरांना भांगे यांच्या रूपाने वाली मिळाला आहे. बीड जिल्ह्यामध्ये ४० % ऊसतोड मजूर मजुरी करून आपल्या पोटाची कोळी भरत अस्तात. मात्र त्यानं योग्य मोबदला मिळत नाही. त्यांच्या मुलांना योग्य शिक्षण मिळत नाही. यासाठीच संघटना बांधली आहे. ही संघटना सर्वात जुनी असुन, या संघटनेस एक कोहिनूर लोक पत्रकार बी भांगे यांच्या रूपाने मिळाला आहे. आता ऊसतोड कामगारांच्या मुकडामांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न भांगे अजुन जोमाने करतील अशी अपेक्षा मजुरांमधे आहे.


भांगे यांनी ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी मुलींसाठी खुप त्यांचें प्रश्न सोडवले आहेत. मुकदमांचे प्रश्न ते सोडवणार आहेत. बीड जिल्ह्यामध्ये व महाराष्ट्र मधे मजूरांना योग्य मोबदला व त्याच्या सोयी सुविधा हककाने मिळवून देण्याचं काम आता भांगे करतील.

# आदिवासी कोळी समाजावर होत असलेला अन्याय थांबवा-गंगाधर वाल्हे

## मुख्यमंत्री यांच्या कडे जात प्रमाणपत्र देण्याची मागणी

धारुर ।प्रतिनिधी

आदिवासी कोळी बांधवांनी जातवैधता प्रमाणपत्र जातप्रमाणपत्र मिळण्यासाठी बोलवली होती ती बैठक काही मुळे रद झाली आहे म्हणून आदिवासी कोळी बांधवांनी केली माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्याकडे जात प्रमाणपत्र जात काढण्यासाठी लवकरच हा प्रश्न तुम्ही लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी बैठक घेऊन तोडगा काढला पाहिजे असा आदिवासी कोळी समाजाच्या विद्यार्थी कडून मागणी होत आहे.आदिवासी कोळी जमातीचे प्रश्न सुटावे म्हणून आपण प्रामाणिक प्रयत्न करीत आहात त्या बद्दल आम्ही आपले तथापी आपण आपल्या दालनात दिनांक २८ ०६ २०२४ रोजी आदिवासी कोळी महादेव कोळी मल्हार कोळी ढोर टोकरे प्रश्नांसाठी आयोजित बैठक काही आमदारांनी रद्द केली आम्ही आदिवासी कोळी महादेव कोळी मल्हार कोळी ढोर टोकरे कोळी जमाती मधील असतांना सुद्धा आम्हा विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळत नसल्याने शैक्षणिक व टोकरे कोळी



जमात बांधवांच्या कत्तली सुरु आहेत तरी आपणास की सदरची दि२८ ०६ २०२४ ची रद्द बैठक आपण तातडीने पुन्हा बोलवावी ही आपणास सर्व आदिवासी कोळी समाजाच्या विद्यार्थ्याकडून बैठक घेण्यासाठी मागणी केली आपण सर्व आदिवासी कोळी विद्यार्थ्यांचा विचार करून जातवैधता व जातप्रमाणपत्र काढण्यासाठी ही बैठक बोलून प्रश्न लवकर मार्गी लावा अशी मागणी सर्व आदिवासी कोळी विद्यार्थ्याकडून केली जात आहे व तसेच आदिवासी कोळी विद्यार्थ्याकडून केली जात आहे व तसेच आदिवासी कोळी बांधवांना जातवैधता जातप्रमाणपत्र काढण्यासाठी अन्य होत असलेला कुठेतरी थांबला पाहिजे अशी मागणी वाल्हे गंगाधर यांच्या कडून केली जात आहे

# लोकनेते विनायकराव मेटे यांना अभिवादन करण्यासाठी जनसागर उसळला

## स्वर्गीय मेटे साहेबांनी मराठा आरक्षणाची चळवळ महाराष्ट्रभर चालवली आणि गोर गरीब मराठ्यांना न्याय दिला - मनोज जरांगे पाटील

बीड ।प्रतिनिधी

लोकनेते विनायकराव मेटे यांचे दोन वर्षा पूर्वी मराठा आरक्षणाच्या बैठकीला जात असताना अपघाती निधन झाले त्यांच्या मृत्यूनंतर ही दुसरी जयंती आज दि. ३० जून रविवार रोजी साजरी करण्यात आली. या सामुदायिक अभिवादन कार्यक्रमास मनोज जरांगे पाटील, मराठवाडा गौरव पुरस्कार प्राप्त अभिनेत्री प्रतीक्षा लोणकर यांच्यासह विविध मराठा संघटनाचे प्रमुख , पदाधिकारी, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते यावेळी शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे आणि आशुतोष विनायकराव मेटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले याप्रसंगी राज्यातील विविध भागातून मेटे साहेबांचे चाहते आणि मान्यवर स्मृती स्थळाचे दर्शन घेण्यासाठी उपस्थित होते.

लोकनेते विनायकराव मेटे यांची आज जयंती बीड येथील कॅनॉल रोड येथील स्मृती स्थळी साजरी झाली. यावेळी आपल्या लाडक्या नेत्याला आदरांजली अर्पण करण्यासाठी चहत्यांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी अनेकांना स्वर्गीय मेटे साहेबांच्या आठवणींनी हुंदके आवरता आले नाहीत अनेकांच्या डोळ्यात अश्रू होते मेटे साहेबांच्या आठवणीने उपस्थित सर्वजण भाऊक होते. यावेळी जडअंतकरणाने आपल्या नेत्याला प्रत्येक जण श्रद्धांजली अर्पण करत होते.

या प्रसंगी माजी मंत्री बदामराव पंडित, मा.आमदार उषाताई दराडे, मा.आ. सीराज भाई देशमुख ,मराठा आरक्षण समन्वय समितीचे अध्यक्ष श्री.सुभाष जावळे पाटील, संभाजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष सुधाकर माने, छावा मराठा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष धनाजी येळकर पाटील, गनिमी कावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मीकांत जोगदंड, मराठा सेवा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नितीन देशमुख, शिवमुद्रा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री सूर्यकांत मोगल, शिवक्रांती युवा सेनेचे संस्थापक अध्यक्ष दत्तात्रय गव्हाणे, संभाजी सेनेचे प्रदेशाध्यक्ष रामेश्वर शिंदे, मराठा क्रांती मोर्चा संभाजीनगरचे समन्वयक सखाराम काळे पाटील, मराठा महासंघ हिंगोलीचे त्रिंबकराव लोंढे पाटील, जिल्हा परिषद सदस्य धुळे ज्ञानेश्वर आबा भामरे, रमेश पोकळे, सचिन मुळूक, ड.मंगेश पोकळे, महेश दाभाडे, अशोक थोरात, सुरेश साबळे, हनुमान मुळीक, गंगाधर काळकुटे, बी.बी.जाधव, किशोर पिंगळे



स्वर्गीय विनायकराव मेटे साहेबांनी मराठा आरक्षणाची चळवळ महाराष्ट्रभर चालवली आणि गोर गरीब मराठ्यांना न्याय दिला - मनोज जरांगे पाटील लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी अण्णासाहेब पाटील यांचे विचार घेऊन मराठा आरक्षणाची चळवळ महाराष्ट्रभर चालवली आणि गोरगरीब मराठ्यांना न्याय देण्याचं काम केले त्यांचे स्वप्न होते गोरगरीब मराठा समाजाला आरक्षण मिळायला पाहिजे अण्णासाहेब पाटील आणि विनायकराव मेटे साहेब यांचे बलिदान मराठा आरक्षणासाठी गेलेले आहे. हे समाज कदापि विसरणार नाही. त्याचबरोबर राज्यात चारशे पेक्षा जास्त मराठा समाजाच्या लोकांचे बलिदान केले आहे. हे बलिदान आपल्याला वाया जाऊ द्यायचे नाही. त्यांचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी आता समाजाच्या खांद्यावर आहे. त्यामुळे कितीही संकट आली तरी आता मागे हटायचे नाही असे प्रतिपादन यावेळी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी केले.

### विनायकराव मेटे हे छातीठोकपणे मराठा समाजासाठी काम करणारे एकमेव आमदार होते - डॉ.ज्योती मेटे
### शिवसंग्रामच्या १ हजार ४८५ कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांचा पाच लाख रुपयांचा विमा

अण्णासाहेब पाटील यांच्या विचाराने प्रेरित होऊन राजकारण आणि समाजकारणात आलेल्या स्वर्गीय विनायकराव मेटे यांनी मी स्वतःच्या जातीसाठी लढतोय याचा न्यूनगंड न बाळगता छातीठोकपणे समाजासाठी काम करणारा एकमेव आमदार म्हणजे मेटे साहेब होते. जातीचं काम करत असताना त्यांनी समाजातील दिन दुबळे, वंचित व इतर घटकांसाठी देखील काम केले. त्यांनी आपल्या हयातीमध्ये मराठा आरक्षण आणि शिवस्मारकासाठी सातत्याने पाठपुरावा केला आणि प्रसंगी त्यांनी आपल्या प्राणांचे मोलही मोजले मेटे साहेबांच्या मागणीला मनोज जरांगे पाटील यांच्या रूपाने फळ मिळाले आहे.

शिवसंग्रामच्या १ हजार ४८५ कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांचा पाच लाख रुपयांचा विमा

या जयंतीनिमित्त लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्यावर प्रेम करणाऱ्या त्यांच्या महाराष्ट्रभरातील १ हजार ४८५ कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांचा विमा शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योती मेटे यांनी उतरवला आहे. यात तब्बल पाच लाख रुपयांचा विमा काढण्यात आला आहे. एखाद्या राजकीय पक्षातील नेत्याने आपल्या कार्यकर्त्यांचा विमा काढावा ही बहुदा पहिलीच घटना असावी असे यावेळी बोलले जात होते.

# योगेश्वरी देवल कमिटीच्या नविन विश्वस्तांची झालेली निवड तात्काळ रद्द करा

## भाविकांचे ठिय्या आंदोलन ; तहसीलदारांना निवेदन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

**महाराष्ट्राची कुलस्वामिनी असलेल्या श्रीक्षेत्र माता योगेश्वरी देवी देवल कमिटीच्या नविन विश्वस्तांची झालेली निवड तात्काळ रद्द करा अशी मागणी सर्वपक्षीय कार्यकर्ते आणि भाविकांनी मागील काही दिवसांपासून सातत्याने केली आहे. याप्रश्नी सोमवार, दिनांक १ जुलै रोजी तहसील कार्यालयासमोर काही काळ ठिय्या आंदोलन करण्यात आले. व तहसीलदार, अंबाजोगाई तथा अध्यक्ष, योगेश्वरी देवल कमिटी यांना निवेदन देण्यात आले.**

तहसीलदार, अंबाजोगाई तथा अध्यक्ष, योगेश्वरी देवल कमिटी यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संपुर्ण महाराष्ट्राची कुलस्वामीनी असलेल्या अंबाजोगाईच्या श्री.योगेश्वरी देवीच्या विश्वस्त मंडळाची मुदत संपल्यामुळे नवीन विश्वस्त मंडळ भाविकांमधून निवड करण्याचे आदेश मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त, बीड यांनी दिले. या आदेशानुसार अंबाजोगाई शहरातील स्थानिक रहिवासी असलेल्या भक्तांना विविध निकष लावून अर्ज मागविण्यात आले. त्यामुळे एकुण १११० भक्तांनी अर्ज दाखल केले. त्यानंतर त्रुटीमध्ये २३७ अर्ज काढले गेले. ८७३ भक्तांचे दररोज ४० या प्रमाणे बीड येथील सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालयात जवळपास ३५० भक्तांनी बीड येथे जाऊन मुलाखती दिल्या. घेण्यात आलेल्या या मुलाखती ईन कॅमेरा न घेतल्याने निवड करण्यात आलेल्या विश्वस्त महोदयांनी अशा कोणत्या प्रकारे मुलाखती दिल्या हे शंकास्पद आहे. सदर निवड झालेल्या विश्वस्तांची यादी उघड झाल्याने अंबाजोगाईकरांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. निवड केलेल्या १६ विश्वस्तांपैकी ४ ते ५ विश्वस्त हे अंबाजोगाई शहराबाहेरील असून त्यांचे अन्य गावाच्या मतदार यादीमध्ये नांवे आहेत. यादीतील शिरीष पांडे व पृथ्विराज साठे वगळता अन्य १३ विश्वस्त हे वर्षातून एक वेळेस तरी देवीच्या दर्शनासाठी येतात का..? या बद्दल नागरिकांकडून सवाल उपस्थित



करण्यात येत आहे. विश्वस्त म्हणुन नवीन नियुक्ती देताना मागील १६ पैकी १० जणांना कमी करण्यात आलेले असून यामध्ये मंदिराच्या मुख्य पुजाऱ्याचाही समावेश आहे. तर नव्याने निवड झालेल्या विश्वस्तांमध्ये आजी व माजी आमदार, माजी नगराध्यक्ष, एक न्यायालयीन तक्रारदार यांचेसह एका व्यक्तीच्या गोतावळ्यामधील तब्बल १० जणांचा समावेश आहे. निवड करण्यात आलेल्या विश्वस्तांमध्ये योगेश्वरी देवीशी निगडीत पारंपारिक सेवा करणारा पुजारी, पौरोहित्य करणारा पुरोहित, पालखी उचलणारे भोई, नवरात्र व अन्य उत्सवात सेवा देणारे कलावंत, गोधंळी, सेवेत असणाऱ्या बारा बलुतेदारांपैकी एक, मागासवर्गीयांपैकी एक यांच्या सारख्या व्यक्तींचा समावेश केला असता तर कोणीही यादीवर आक्षेप नोंदविला नसता अशी चर्चा शहर व परिसरात सुरू आहे. वरील प्रकरणात विश्वस्तांची निवड करतांना मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त, बीड यांच्या कार्यालयाकडून विशेष व्यक्तींचाच समावेश केलेला आहे. तरी सदर प्रकरणी चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करावी अन्यथा लोकजनशक्ती पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी. असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर शिवसेना (उबाठा) तालुकाप्रमुख बाळासाहेब शेप प्रिन्स, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कॉ.बब्रुवाहन पोटभरे, भिमशक्तीचे भिमराव सरवदे, लोकजनशक्ती पार्टीचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे, कृष्णा सुनिलराव लोमटे, दिपक भाऊ कांबळे यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. तर ठिय्या आंदोलनात शिवसेना (उबाठा) केज तालुकाप्रमुख अशोक जाधव, विधानसभा महिला आघाडी संघटिका डॉ.नयनाताई शिरसाट, शहरप्रमुख अशोक हेडे, जिल्हा समन्वयक अशोकराव गाढवे, विधानसभा समन्वयक युवराज चव्हाण, विधानसभा सचिव दुल्हेखा पठाण, मा.तालुकाप्रमुख बाळासाहेब वाघाळकर, महिला आघाडी शहरप्रमुख सुनिता जाधव, तालुका सचिव बाबा भिसे, उपतालुकाप्रमुख निखील पाडुळे, शहरसचिव शंकर भिसे, उपतालुकाप्रमुख बालाजी चाटे, उपतालुकाप्रमुख विलास घाडगे, उपशहर प्रमुख पप्पू आपेट, युवासेना शहरप्रमुख निलेश जाधव, भीमशक्तीचे रवी आवाडे. सुमित आवाडे, धीरज आवाडे, लोकजनशक्ती पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर गोरे, बीड जिल्हा कार्याध्यक्ष दिनेश घार, जिल्हा उपाध्यक्ष मारोती शिंदे, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अशोक काळे, अंबाजोगाई शहराध्यक्ष प्रदीप घुंडरे, अंबाजोगाई शहर कार्याध्यक्ष आदित्य चौरे, शहर उपाध्यक्ष अर्जुन शिंदे, विशाल शेवाळे, मनोज जोगदंड, निसार पठाण, गजानन तिरमले, फिरोज शेख, पिंटू कांबळे आदींसह विविध पक्षांचे नेते, कार्यकर्ते आणि देवीचे भाविक सहभागी झाले. याप्रकरणी शासन व प्रशासनाने तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कार्यवाही केली नाही तर मोठे जनआंदोलन करण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

# ४१ वर्षाच्या प्रदिर्घ सेवेनंतर बबन वंजारे सेवानिवृत्त
## पाटोदा भुमीअभिलेख कार्यालयात रंगला सेवापुर्ती सोहळा





पाटोदा / प्रतिनिधी

बीड तालुक्यातील येळमघाट येथील रहिवासी व पाटोदा येथील भुमीअभिलेख कार्यालयात दप्तरबंद म्हणून कार्यरत असलेले मा. बबन वंजारे व हे ४१ वर्षाच्या प्रदिर्घ सेवेनंतर नियत वयोमाना नुसार सेवानिवृत्त झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उप अधिक्षक मा.शैलेंद्र गायकवाड व माजलगाव भुमीअभिलेख कार्यालयाचे संनदान साहेब हे होते. यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात मा.शैलेंद्र गायकवाड म्हणाले की बबन वंजारे म्हणजे कामाप्रती समर्पित व्यक्ती असून कोणतीही जबाबदारी सोपवली ती वेळे आधी करण्यात पटाईत होते.तसेच कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस नेमकं काम काय,व ते कोणाकळे जावं लागेल आदी गोष्टींचं योग्य मार्गदर्शन करीत असल्याने कार्यालयातीत प्रत्येक कर्मचारी असो किंवा कामानिमित्त येणारा व्यक्ती बबन वंजारे यांच्या कामाचं कौतुक केल्याशिवाय जात नसे त्यामुळे बबन वंजारे यांची कमतरता कार्यालयाला नेहमीच भासत राहील असे प्रतिपादन केले.बबन वंजारे मागच्या ४१ वर्षांपूर्वी भुमीअभिलेख कार्यालयात रुजू झाले होते.या दरम्यान त्यांनी माजलगाव,बीड आणि आष्टी येथे सेवा केल्यानंतर त्यांची बदली पाटोदा येथे १२ वर्षांपूर्वी बदली झाली होती. पाटोदा येथे त्यांच्याकडे दप्तरबंद विभागाची जबाबदारी होती. तिथेही अगदी चोखपणे आपले कर्तव्य बजावल्यानंतर दि .२८ जुन शुक्रवार रोजी ते सेवानिवृत्त झाले.दरम्यान भुमीअभिलेख कार्यालयात त्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी त्यांचा सपत्नीक सत्कार करून सेवेतून निरोप देण्यात आला या प्रसंगी तर कार्यालयातील सुनिल बागुल व पुजारी साहेब यांनी बबन वंजारे यांचे कार्यालयातील कामे त्यांच्या स्वभावाबद्दल जुन्या आठवणींना उजाळा दिला यावेळी अनेकांचे डोळे भरून आले होते.यावेळी कार्यालयाचे कुरूडे साहेब,वायसकर मॅडम,सुरोजनी मॅडम,वीर,जाधव,पाठक,प्रा.वंजारे सर,मा.कोषागार महेबुब पठाण,रहिम भाई, शहाबाज सय्यद,पत्रकार जावेद शेख व बबन वंजारे यांचे कुटुंब आदी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महसूल कर्मचाऱ्यांनी बेकायदा संप करून जनतेला वेठीस धरू नये

## महसूल कर्मचाऱ्यांच्या संपामुळे सर्व सामान्य नागरिकांचे व विद्यार्थ्यांचे हाल

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील गोदावरी नदीपात्रात मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा करून त्याची चोरटी वाहतूक केली जात आहे. वाळू माफियांनी नदीपात्राची अक्षरशः चाळण केली आहे. तसेच गेवराई तालुक्यात वाळू माफियांची दहशत निर्माण झाली आहे. त्यांची एवढी हिंमत वाढली आहे की, ते सरकारी अधिकाऱ्यांना जीवे मारण्यासही मागे पुढे पाहात नाही. मागील काही दिवसांपूर्वी अवैध वाळू रोखण्यासाठी गस्तीवर असलेल्या महसूल विभागाच्या पथकावर वाळू माफियांनी हल्ला केल्याचा निषेधार्थ सलग चार ते पाच दिवस महसूलचे कामकाज बंद राहिले. त्यामुळे सर्वसामान्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. बेकायदा संप करून महसूल कर्मचाऱ्यांनी जनतेला वेठीस धरू नये, असे आवाहन मनसेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोटे यांनी केले आहे.



### एरव्ही अधिकारी, कर्मचारी गप्प का?

प्रशासनाने कर्मचारी किंवा अधिकाऱ्यांवर हल्ला झाल्यावर प्रशासनाला जाग येते का? एरव्ही सर्रास वाळूचा उपसा सुरू असताना महसूल प्रशासन गप्प का बसते? असा सवाल करून महसूल कर्मचाऱ्यांनी कामकाज सुरू करून सर्वसामान्य शेतकरी व विद्यार्थ्यांचे प्रश्न मार्गी लावावे, अशी मागणी मनसेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोटे यांनी केली आहे.

### हल्ला झाल्यानंतरच प्रशासनाला जाग येते का? - राजेंद्र मोटे

गेवराई तालुक्यासह लगतच्या गावांसाठी गोदावरी नदी ही वरदान आहे. तालुक्यातील कुत्तेगाव, राक्षसभुवन, माळसपिंपळगाव, बोरगाव, सावरगाव, खामगाव, गुळज, नागझरी, आगरनांदूर, संगमजळगाव, हिंगणगाव, गंगावाडी, भोगलगाव, जोगलादेवी, पांढरी येथून सर्रास अवैध वाळूचा उपसा करून त्याच्या वाहतूकीसाठी दहा टायर हायवा, टिप्परचा वापर केला जातो. हे हायवा टिप्पर वाळूने भरून शहर व बायपास मार्गाने पोलीस व महसूल चे तलाठी, मंडळ अधिकारी यांच्या समोरून वाहतूक केली जाते. मात्र याकडे महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

यात २५ जून रोजी रात्री तहसीलदार संदीप खोमणे व त्यांचे पथक त्यांच्या शासकीय वाहनाने कारवाईसाठी गस्तीवर असताना वाळू माफियांनी पथकावर हल्ला केला होता. या हल्ल्याचा निषेधार्थ सलग चार ते पाच दिवसांपासून महसूलचे कामकाज बंद ठेवले आहे. जी घटना घडली तिचा तपास करा व पोलिसांना मदत मागावी, परंतु महसूलने खूशाल कामकाज बंद ठेवून सर्व सामान्य लोकांना नाहक त्रास देऊ नका, असे आवाहन मनसेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोटे यांनी केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT